स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत

भूगोल विषयातील

पीएच. डी. पदवी करीता सादर

कोल्हापूर जिल्ह्यातील शेती पूरक दुग्ध व्यवसाय एक भौगोलिक अभ्यास

सन १९९१ - २०११

संशोधन आराखडा

--------------o संशोधक o--------------

श्री. प्रमोद हुलवान (NET)

मार्गदर्शक

डॉ. ए. के. हांगे.

भूगोल विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर

फेब्रुवारी २०१६

कोल्हापूर जिल्हयातील शेती पूरक दुग्ध व्यवसाय एक भौगोलिक अभ्यास सन १९९१ - २०११

प्रस्तावना :

देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सबलीकरणात दुग्ध व्यवसायाने फार महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आजही भूमिहीन, मजूरवर्ग व शेतकरी मोठया प्रमाणावर या व्यवसायाचा उपयोग चरितार्थ चालवण्यासाठी करतात. थोडक्यात या कार्यक्षेत्राचे देशाच्या रोजगार निर्मिती व दारिद्रय निर्मूलनाच्या कामातील योगदान उल्लेखनीय आहे. सन १९७० मध्ये नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डने भारतात 'ऑपरेशन प्लड किंवा दुग्धक्रांती' हा दीर्घकालीन व जगातील सर्वात मोठा दुग्ध उत्पादन विकास कार्यक्रम हाती घेतला जगातील सर्वोच्च याचाच परिणाम म्हणून दुग्ध उत्पादक देशांच्या यादीत भारताची गणना होऊ शकलीइतकेच नव्हे तर ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर रोजगार व स्वयंरोजगाराच्या कायमस्वरूपी संधी उपलब्ध झाल्यामुख्य म्हणजे भारत देश दुधाच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला.

महाराष्ट्रीतील प्राकृतिक रचनेत विविधता आढळते त्याचप्रमाणे हवामानामध्ये ही विभिन्नता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात हवामान, पाणी, माती यामध्ये वैविध्य आहे. महाराष्ट्रातील शेती ही प्रामुख्याने कोरडवाहू असून मोसमी पावसावर अवलंबून आहे. साहजिकच महाराष्ट्रात एकाच प्रकारची शेती होत नाही. बहुतेक सर्व प्रकारची अन्नधान्ये, फळे, फुले, भाजीपाला यांचे उत्पादन महाराष्ट्रात घेतले जाते. त्यामुळेच देशाच्या कृषी व्यवसायात महाराष्ट्राचे आगळे स्थान निर्माण झाले आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय अर्थातच शेती हाच आहे. एका अर्थाने महाराष्ट्रात पूर्णान्न शेती केली जाते.

शेतकरी शेतीला केवळ उपजीविकेचे साधन मानत नाहीत. महाराष्ट्रात 'कृषी संस्कृती' हा शब्द सहजगत्या वापरला जातो. शहरीकरण जरी वाढत असले, तरी आजही 'शेती' हा लाखो शेतक-यांच्या जीवनाचे एक प्रमुख अंग आहे, जीवन जगण्याची पध्दती आहे. महाराष्ट्रातील अनेक सण-उत्सव हे शेतीच्या वेळापत्रकाशी जोडलेले आहेत.

महाराष्ट्रात शेती हे असे क्षेत्र आहे की, ज्यावर संपूर्ण राज्याचे अर्थकारण अवलंबून आहे. सर्वांगीण विकासासाठी सातत्याने आधुनिकतेची कास धरणा-या महाराष्ट्रातील कष्टकरी शेतकरी शेती क्षेत्रातही सातत्याने नवनवीन उपक्रम, तंत्रज्ञान यांचा अवलंब करून अपार कष्टांच्या माध्यामातून आपले राज्य शेती व शेतीपूरक उदयोग या क्षेत्रांत प्रगती साधत आहे.

शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय व हा पूर्वीपासूनच परंपरागत चालत आलेला महत्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायासाठी प्रामुख्याने संकरीत गाई गावठी दुधाळ गाई आणि दुधाल म्हशी पाळल्या जातात. प्रचलित पध्दतीने दुग्ध व्यवसाय करण्यापेक्षा आधुनिक तंत्राने व्यापारी दृष्टया हा व्यवसाय केला असता निश्चितपणे शाश्वत धंदा असून, आर्थिकदृष्टया चांगला परवडतो. महाराष्ट्रात शेतक-यांनी दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून स्वीकारल्यामुळे वर्षभर उत्पादन व रोजगाराचे साधन निर्माण झाले आहे. राज्यातील सुमारे ६५ टक्के शेतकरी शेतीबरोबर दुग्धव्यवसाय करतात. महानंद, गोकूळ, वारणा आदी अनेक दुग्ध व संबंधित उत्पादनांचे मोठे प्रकल्प महाराष्ट्रात कार्यरत आहेत. उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक व पशुपालन या माध्यमातून लाखो लोकांना रोजगार देणारे हे क्षेत्र आहे. कोल्हापूर जिल्हा हा दुध उत्पादनामध्ये अग्रेसर जिल्हा आहे आणि येथून मोठया प्रमाणात दुध आणि दुधाच्या पदार्थांची निर्यात केली जाते. दुध उत्पादनामध्ये गोकुळ, वारणा व मयुर हे अग्रेसर संघ आहेत. त्यामध्ये सहकारी तत्वावर आधारीत गोकुळ सर्वात मोठा आहे.

<u>संशोधन विषयाची निवड व अभ्यास क्षेत्र :-</u>

श्री शिवछत्रपतींच्या स्पर्शाने पावन झालेल्या व पंचगंगेच्या काठी दक्षिण काशी म्हणून प्रसिध्द असलेल्या भूमीमध्ये, राजर्षी शाहू महाराजांच्या आदर्श समाज कार्याचा वारसा घेऊन जिल्हयातील ग्रामीन भागाच्या विकासाचे कार्य करीत आहे. कोल्हापूरात हे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे माहेरघर मानले जाते याचा परिणाम हा शेती पूरक दुग्ध व्यवसायावर झाल्याचे दिसून येते.

कोल्हापूर जिल्यात २०११ च्या आकडेवारी नुसार ४३४० सहकारी दुग्ध व्यवसाय करणारी संस्था आहे. या घटकाचा परिणाम हा शेती पूरक दुग्ध व्यवसायावर झाल्याचे दिसते.

शेती पूरक दुग्ध व्यवसायाचा परिणाम हा शेतीच्या आर्थिक परिणामावर त्याचबरोबर युवकांना नविन उदयोग व रोजगार मिळण्यात मदत झाली आहे. अशा घटकांचा अभ्यास करणे. शेतीपूरक दुग्ध व्यवसायामुळे मोठया प्रमाणात ग्रामीण भागातील अर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत झाली आहे. यासाठी या घटकाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

दूध उत्पादनात वाढ, उत्पादनातील उत्सर्जित पदार्थांची योग्य व तत्काळ विल्हेवाट, दुभत्या जनावरांच्या प्रतवारीत सुधारणा करणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, या व्यवसायात जास्तीत जास्त रोजगार संधी निर्माण करणे. या उदयोग क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शिक्षणाव्यतिरिक्त काही गोष्टही आवश्यक असतात. उदा. शास्त्रीय दृष्टिकोन, भावनिक बुध्दयांक, शहरी जीवनापासून लांब खेडयापाडयात राहून काम करण्याची तयारी व अंगमेहनतीची सवय इत्यादी अनेक होय. देशातील वाढती लोकसंख्या आणि दुध व दुग्धोत्पन्न पदार्थांच्या पोषक गुणधर्मांची जागृती पाहता दुधाच्या मागणीत भविष्यात सतत वाढ होत राहणार हे नक्कीच. सध्या देशात अस्तित्वात असणा-या दुग्ध प्रकल्पातून व देशाबाहेर असलेल्या याच उदयोग क्षेत्रातून उत्पादन, पुरवठा, दुग्ध प्रक्रीया, वितरण अशा वेगवेगळया विभागांतून वरील शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्रगतीच्या संधी उपलब्ध होतात. सहकारी दुग्ध संस्था ग्रामीण बॅक, दुग्ध प्रक्रिया व दुग्ध उत्पादन प्रकल्प, कृषी विदयापीठातून प्रशिक्षकाच्या संधीही मिळू शकतात. तसेच या व्यवसायासाठी आवश्यक असणारी उपकरणे बनवणा-या उदयोगातून इक्विपमेंट डिझायनिंग, प्लान्ट डिझायनिंग, फॅब्रिकेशन या प्रकारच्या कामांसाठी रोजगार मिळू शकतात.

संशोधनाची उदिदष्टे

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची दिशा निश्चित करण्यासाठी खालील उदिष्टटये ठेवण्यात आलेली आहेत.

१. कोल्हापूर जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. कोल्हापूर जिल्ह्यातील शेती क्षेत्राचा अभ्यास करणे.

३. कोल्हापूर जिल्ह्यातील शेती पूरक दुग्ध व्यवसायाचा अभ्यास करणे.

४. कोल्हापूर जिल्ह्यातील शेती पूरक दुग्ध व्यवसायाचे विश्लेषण करणे.

५. कोल्हापूर जिल्ह्यातील शेती पूरक दुग्ध व्यवसायाच्या समस्या व उपाय.

६. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यामध्ये दुग्ध व्यवसायाची जनजागृती करणे.

७. कोल्हापूर जिल्ह्यातील दुग्ध सहकार क्षेत्राच्या परिणामाचा अभ्यास करणे.

गृहितके :

१ कोल्हापूर जिल्हयातील हवामान, जमीन, नवी व भूमी या भौगोलिक गोष्टींचा परिणम दुग्ध व्यवसायावर पडला आहे.

२ कोल्हापूर जिल्हयातील शेती विकासात दुग्ध व्यवसायाचा मोठा हातभर आहे.

३ सहकार क्षेत्रामुळे दुग्ध व्यवसायाची प्रगती झाली आहे.

४ शेती बरोबर दुग्ध व्यवसाय हा जोड व्यवसाय म्हणून पुढे आला आहे.

५. कोल्हापूर जिल्हया हा महाराष्ट दुग्ध व्यवसायात अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जात आहे.

अभ्यास क्षेत्र :

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण बाजूस वसलेले आहे. या जिल्हयाचे भौगोलिक स्थान १५° ५० ’२०’’ ते १७° १०’ ४५’’ उत्तर अक्षांश व ७३° ४३’१६’’ ते ७४° ४४’११’’ पूर्व रेखांश असे आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस सहयाद्रीचा

कडा, उत्तरेस वारणा नदी, पुर्वेस अंशत: कृष्णा नदी व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा अशा चतु:सिमा आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७४६ चौ. कि. मी. इतके असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ टक्के आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार ३८७६००१ जिल्हयाची लोकसंख्या आहे. जिल्हयामध्ये करवीर (कोल्हापूर), पन्हाळा, शाहुवाडी, हातकणंगले, शिरोळ, कागल, गगनबावडा, राधानगरी, गारगोटी, आजरा, गडहिंग्लज व चंदगड ही १२ तालुके असून ४ उपविभागात विभागलेले आहेत. तसेच जिल्हयामध्ये ११२६ गावे, १३ शहरे, कोल्हापूर महानगरपालिकासह ९ नगरपालिका अस्तित्वात आहेत. जिल्हयाचे हवामान हे अनुकुल आहे. सन २०११-१२ मध्ये सर्वात जास्त पाऊस ७०७७ मि. नी. गगनबावडा तालुक्यात तर सर्वात कमी २७२ मि.मी पाऊस शिरोळ तालुक्यात पडला होता.

माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व द्वितीय सामुग्रीचा उपयोग करणार आहे. प्राथमिक माहिती ही प्रत्यक्ष स्थळाच्या ठिकाणी पाहणी करुन मिळवणार आहे यासाठी पुढील काही टप्पे करणार आहे.

अ) कोल्हापूर जिल्हयातील शेती पूरक दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतक-याकडून करून प्रश्नावली भरून घेण्यात येईल व त्याचे शास्त्रीय पध्दतीने संस्करण करून विश्लेषन करण्यात येईल. यासाठी कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यातुन प्रत्येकी २०० शेतकऱ्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल.

ब) कोल्हापूर जिल्हयातील डेअरी व्यवसाय करणा-या व्यवसायाकडून प्रश्नावली भरुन घेणे.

द्वितीय सामुग्री :

तर द्वितीय सामुग्रीने संदर्भ ग्रंथ, मासिके, जर्नल, संशोधन लेख, गॉझिटेअर, सेन्सेस हॅन्डबुक, जिल्हा सामाजिक व अर्थिक समालोचन, सांख्यिकीय अहवाल व शासकीय आराखडा इत्यादीतून माहिती करून घेण्यात येईल. संकलित करण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीय माहितीचे शास्त्रीय पध्दतीने संस्करण करून विश्लेषण करण्यात येईल.

विषय सामग्रीचा आढावा. (REVIEM OF LITERATURE)

शेतीपूरक दुग्ध व्यवसाय हा अर्थिक घटक प्रादेशिक अभ्यासाठी अत्यंत महत्वाचे मानले जाते. त्या कारणामुळे काही तज्ञ मंडळींनी हा विषय शेती पूरक दुग्ध व्यवसाय हा विषय एम.फील व पी. एच. डी. च्या संशोधनासाठी अभ्यासलेला आहे. यात प्रामुख्याने एस. बी. सारंग (१९८२) यांनी कोल्हापूर जिल्हयातील दुग्ध शेती हा विषय पीएच.डी. संशोधनासाठी अभ्यासलेला आहे. त्यांच्या अभ्यासात शेती वितरण, दुग्ध शेती पध्दतीचा अभ्यास, दुग्ध शेती मधील वाढ व अर्थिक घटकाचा अभ्यास यात केला आहे. टी.एन. घोलप (१९८७) यांनी महाराष्ट्रातील पशुधन व पशुखादय वितरणांचा अभ्यास पीएच.डी. मध्ये संशाधन केला आहे.

पी.ए. कोळी यांनी १९८७ साली आपल्या पीए.डी. संशोधनात कोल्हापूर जिल्हयातील दुग्ध व्यवसासाचे वाढ व महत्व यांचे अभ्यास केला आहे.

ए.बी. खटकले यांनी सन १९९५ मध्ये सोलापूर जिल्हयातील दुग्ध शेतीचा अभ्यास हा एम.फील पदवीसाठी साठी केला आहे.

ए.ए. देवकर यांनी आपल्या बारामती मधील दुग्ध व्यवसायाचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

प्रकरणाची रूपरेषा :

या संशोधन विषयाची मांडणी सहा प्रकरणात करण्यात आली आहे.

१. **प्रकरण एक** - :

१.१ : प्रस्तावना

१.२ : शेती पूरक दुग्ध व्यवसायाचे महत्व

१.३ : दुग्ध व्यवसायाची वैशिष्टे

१.४ : विकास

१.५ : शासकीय योजना

१.६ : संशोधनाचे उद्दिष्टये

१.७ : साहित्याचे पुनरावलोकण,

२. **प्रकरण दोन** -

अभ्यास क्षेत्रातील प्रदेशाची भौगोलिक पार्श्वभुमी

२.१ : प्रस्तावना

२.२ : स्थान विस्तार

२.३ : प्राकतिक रचना

२.४ : भुरचना

२.५ : नदीप्रणली

२.६ : हवामान

२.७ : मृदा

३. प्रकरण तीन -

या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्हयामधील शेती पध्दती, शेती खालीलक्षेत्र, शेती पूरक व्यवसाय.

४. प्रकरण चार -

कोल्हापूर जिल्हयातील शेतीपूरक दुग्ध व्यवसायीक चे स्वरूप वैशिष्टे इत्यादी घटकाचा अभ्यास करणेत येईल.

५. प्रकरण पाच -

कोल्हापूर जिल्हयातील शेतीपूरक दुग्ध व्यवसाईक शेतक-यांच्या समस्या व उपाय सुचविणेत येईल.

६. प्रकरण सहा -

या प्रकरणामध्ये संशोधन कार्याचा सारांश रूपातून निष्कर्ष स्पष्ट करणेत येईल.

संदर्भसुची (Reference)

१. अंजली शिरीष देशपांडे, (२०१३), दुध उत्पादन व्यवसाय, आदित्य पब्लिकेशन, औरंगाबाद.

२. डॉ. ना. पु. दक्षिणकर, (२००५), दुध उत्पादन हाताळणी व विक्री, मंगेश प्रकाशन नागपूर.

३. डॉ. पी. एन. देशपांडे, (२०१२), दुध उत्पादन व्यवसाय, आदित्य पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. डॉ. प्रकाश देशपांडे, (२००५), दुध व्यवसाय पशुसंवर्धन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

५. कोल्हापूर जिल्हा दुध संघ कोल्हापूर.

5. www. pib. nic. in.

6. www. jagran. com.

7. www. agrowon. com.

8. S. B. Sarang 1982, dairy farming in Kolhapur district.

9. T. N. Gholap 1987, distribution of livestock and fodder.

10. P. A. Koli 1987, Growth and economic significance of milk co – operatives in Kolhapur.

11. D.S. Bagade 2006, economics of dairy farming in solapur.

मार्गदर्शक
डॉ. ए. के. हांगे.
भूगोल विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर

संशोधक
श्री. प्रमोद हुलवान (NET)